

# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक २६.०६.२०२६ शुक्रवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २५.०६.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १९ केसेसमध्ये २१ ईसमांवर कारवाई करून ७,०३,४९१/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,६०४ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,८०,३५५/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) यशोधरानगर पोलीसांची कामगीरी :— घरफोडी करणाऱ्या पाहिजे आरोपीस अटक. ०३ गुन्हे उघडकीस.**

दिनांक ०४.०५.२०२५ चे २३.४५ वा. ते दिनांक ०५.०५.२०२५ चे ०८.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत घर नं. २२, शाहु मोहल्ला, कुंदनलाल गुप्ता नगर, नागपुर येथे राहणारे फिर्यादी किशोर मारोती निमजे वय ४३ वर्षे हे पाचपावली येथे नातेवाईकाचे लग्नाकरीता गेले असता व त्यांचे मुले हे त्यांचे घराला कुलुप लावुन शेजारी झोपण्याकरीता गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडीकोंडा तोडुन, घरात प्रवेश करून, बेडरूम मधील लोखंडी कपाटातील रोख १,००,०००/— रू. तसेच, सोन्याचे दागिने असा एकुण ६,०२,५००/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे अज्ञात आरोपींविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान यशोधरानगर पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा पाठपुरावा करतांना, तांत्रिक तपास करून तसेच, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, गुन्हयातील पाहिजे आरोपी मुबारक वकील बाबु शहा वय २१ वर्षे रा. कुंदनलाल गुप्ता नगर, यशोधरानगर, नागपुर यास सापळा रचून ताब्यात घेतले. आरोपीची पोलीस कोठडी प्राप्त करुन, त्यास गुन्हयासंबंधाने विचारपुस केली असता, त्याने वर नमुद गुन्हा त्याचे इतर साथीदार पाहिजे आरोपी क्र. १) निकेश बलराम शाहु वय २२ वर्षे रा. कुंदनलाल गुप्ता नगर, यशोधरानगर, नागपूर २) नरेंद्र उर्फ बाली चिंतामण बोकडे वय २३ वर्षे रा. फुकटनगर, यशोधरानगर, नागपुर ३) सलमान इकबाल खान वय अंदाजे ३० वर्षे रा. कुंदनलाल गुप्ता नगर, यशोधरानगर, नागपूर यांचेसह संगनमताने केल्याची कबुली दिली. आरोपीस अधिक विचारपुस केली असता, त्याने वर नमुद गुन्ह्याव्यतीरिक्तपोलीस ठाणे कोराडी व कळमणा हद्यीत प्रत्येकी ०१ घरफोडीचा गुन्हा असे एकूण ०३ गुन्हे केल्याचे सांगितले. आरोपीचे ताब्यातुन पिवळया धातुची लगड वजनी ८८ ग्राम  व पिवळया

धातुचे वेगवेगळे दागिने वजनी १८.३१ ग्राम असा एकुण किंमती १०,७०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ईतर पाहिजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. युनुस शेख, पोउपनि वैभव नागे, पोहवा. राहुल बोंद्रे, पोअं. मनिष झरकर, संदीप वानखेडे, शितेश चौरसिया, भुषण येरोजवार व प्रविण बावणकर यांनी परिमंडळीय सायबर सेलचे पोअ. आशिष पिपरहेटे व प्रविण इनवाते यांचे विशेष सहकार्याने केली.



**३) तहसील पोलीसांची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

**अ)** दिनांक २५.०६.२०२६ चे १८.५५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे तहसील येथील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे **अंमली पदार्थ विरोधी सप्ताह मोहीम** राबवित असतांना, पेट्रोलींग दरम्यान त्यांना माहिती मिळाली की, पोलीस ठाणे तहसील हद्दीत ईदगाहचे मागील परिसरात, रेल्वे क्वॉर्टरचे समोर, एक इसम वय अंदाजे २० ते २५ वर्ष, ज्याने काळया रंगाचा टिशर्ट व निळया रंगाचा पॅन्ट घातलेला असून, तो अंमली पदार्थ विक्री करण्याकरीता उभा आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन, पंचासमक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता, तेथे प्राप्त वर्णनाचा इसम दिसून आला. त्याचेजवळ पोलीस जात असतांना, तो पोलीसांना पाहून पळून जाऊ लागला. त्याचा पाठलाग करुन, त्यास ताब्यात घेऊन त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव मोहम्मद सुफीयान वल्द मोहम्मद नासीर वय २५ वर्षे रा. गरीब नवाज मस्जिद जवळ, बोरीयापुरा, तहसील, नागपूर असे सांगीतले. एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन, त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात पॅन्टचे खिशात झिपलॉक पन्नीत एकुण १२.२५ ग्रॅम एम.डी. पावडर मिळुन आल्याने एम.डी. पावडर, किं. १,२३,४००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीचे कृत्य हे कलम ८(क),२१(ब) एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे तहसील येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**ब)** दिनांक २३.०६.२०२६ चे ०५.१० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे तहसील येथील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे **अंमली पदार्थ विरोधी सप्ताह मोहीम** राबवित असतांना, पेट्रोलींग दरम्यान त्यांना पोलीस ठाणे तहसील हद्दीत, मेयो हॉस्पिटल जवळील प्रायमरी शाळेजवळ उभी असलेली एक मारोती

सुझुकी स्विफ्ट गाडी क्र. एमएच ४९ एएस १७६३ मध्ये एक इसम संशयीत वाटल्याने, कारजवळ जाऊन कारमधील इसमाचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नावे मोहम्मद शायान नदीम सैफी वल्द लियाकत नदीम सैफी वय २८ वर्षे, रा. अशरफी मेडीकल समोर, सैफी नगर, तहसील, नागपूर असे सांगीतले. त्याची विचारपुस केली असता, त्याने उडवा–उडवीची उत्तरे दिल्याने तसेच, त्याचेजवळ अंमली पदार्थ असल्याचा दाट संशय आल्याने, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन, पंचासमक्ष त्याची व कारची झडती घेतली असता, त्याचे ताब्यात झिपलॉक पन्नीत एकुण ३.८६ ग्रॅम एम.डी. पावडर मिळुन आली. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०१ मोबाईल व मारोती सुझुकी स्विफ्ट गाडी असा एकुण ४,०८,६००/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीचे कृत्य हे कलम ८(क),२२(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे तहसील येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील दोन्हीही कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्रीमती विनीता साहू, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ३), मा. श्रीमती अनिता मोरे, सहा. पोलीस आयुक्त (कोतवाली विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. राहुल वाढवे, सपोनि. विठ्ठल शिंदे, पोउपनि. संजय माने, मपोउपनि पल्लवी गोसावी, सफौ. अनिल ठाकूर, राजेशसिंग ठाकूर, पोहवा. प्रदीप सोनटक्के, संदीप गवळी, संजय शाहू, राम यादव, विनोद गवई, नापोअं. फिरोज खान, पोअं. राशिद शेख, पकंज बागडे, पंकज निकम, दिपक मोरे, वैभव कुलसुंगे व सुनिल सेलोकार यांनी केली.

## (गुन्हे)

**१) पोलीस ठाणे नंदनवन :– घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २५.०६.२०२६ चे १८.१० वा. ते १८.४० वा. चे दरम्यान, नंदनवन पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, केडीके टि पॉईन्ट जवळील मोकळया मैदानाजवळ, एक इसम ज्याने अंगात पोपटी रंगाचा टिशर्ट व काळया रंगाचा लोअर पॅन्ट घातलेला असून, तो हातात लोखंडी चाकू घेवून येणारे–जाणारे लोकांना शिवीगाळ करुन धूमाकूळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, प्राप्त वर्णनाचा इसम हा एका ग्रे रंगाच्या व विना नंबर प्लेटच्या ॲक्टिवा मोपेडवर दिसून आला. त्यास हटकले असता, तो पोलीसांना पाहुन पळु लागला. त्याचा पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव साहील अली मुश्ताक अली वय १९ वर्षे, रा. हसनबाग, कादरीया मदरसा जवळ, नंदनवन, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे कंबरेत एक लोखंडी चाकु किंमती १५०/– रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे नंदनवन येथे पोउपनि. गोविंद दळवी यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे अजनी :– घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २५.०६.२०२६ चे २०.३५ वा. चे सुमारास, अजनी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, पोलीस ठाणे हद्दीत अविनाश ग्राऊंड, आरपीएफ कॅन्टीनजवळ, अजनी येथे एक इसम

वय अंदाजे ३० ते ३५ वर्ष वयोगटाचा, ज्याने अंगात शेंदरी रंगाचा टिशर्ट व काळया रंगाचा लोअर पॅन्ट घातलेला संशयीत हालचाली करतांना दिसुन आला. त्यास हटकले असता, तो पोलीसांना पाहुन पळु लागला. त्याचा पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अंकुश शामकुंवर डहाट वय ३६ वर्षे, रा. प्लॉट क्र. ४, अमर संजय जी.एन. सोसायटी, सुहास इडीले यांचे घरी किरायाने, मनिषनगर, बेलतरोडी, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात एक जुनी लोखंडी तलवार किंमती ३००/— रू. ची मिळून आल्याने जप्त करण्यात आली.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने तलवार बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे अजनी येथे पोउपनि. वैभव गुंजाळ यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे इमामवाडा :— फसवणुक करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी खेमचंद रोचीदास बालवानी वय ५७ वर्ष रा. प्लॉट क्र. ६२, बॅक कॉलनी, पुंशी हॉस्पीटल जवळ, नागपूर हे सन २०१९ मध्ये पोलीस ठाणे इमामवाडा हद्दीत, टाटा कॅपिटल हाईटस् येथे राहणाऱ्या त्यांचे मित्राला भेटण्याकरीता गेले होते. तेथे त्यांना सोसायटीचे नोटीस बोर्डवर ज्या फ्लॅट धारकांनी बॅकेकडून घेतलेले गृहकर्ज परत न करणाऱ्यांची यादी दिसून आली. त्यामध्ये फ्लॅट क्र. १२०१ चा उल्लेख असून तो आरोपी क्र. १) नितीन सुधाकर ढमके वय ४८ वर्ष २) सौ. विद्या नितीन ढमके वय ४५ वर्ष दोन्ही रा. देवांजली अपार्टमेंट, रेशीमबाग, नागपूर यांचे नावे असल्याचे फिर्यादी यांना समजले. दिनांक १२.११.२०१९ ते सन २०२२ दरम्यान, फिर्यादीने फ्लॅट क्र. १२०१ बघीतला असता, तो पसंत आल्याने, आरोपी क्र. १ व २ यांचेसोबत १ कोटी २० लाख रुपयांमध्ये फ्लॅट विकत घेणेबाबतचा सौदा केला. दोन्ही आरोपीतांनी संगनमताने फिर्यादीचा विश्वास संपादन करुन, फिर्यादीस वेळोवेळी वेगवेगळे कारणे सांगून फिर्यादीकडून ५१ लाख रुपये घेतले. फिर्यादीने प्लॉटचे विक्रीदस्त त्यांचे नावे करुन देणेबाबत आरोपीतांना वारंवार म्हटले असता, आरोपीतांनी कोणतेही कागदपत्रे तयार करुन न देता टाळाटाळ केली. तसेच, नमुद फ्लॅट हा डॉ. लाड नावाचे इसमास कोटयावधी रुपये घेऊन विक्री केला. आरोपींनी संगणमत करून, फिर्यादी सोबत फ्लॅट विक्री करारनामा करून, फिर्यादीकडून ५१ लाख रुपये रक्कम घेवुन, कोणतेही कागदपत्रे करुन न देता, फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करून फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्जाचे चौकशीवरून पोलीस ठाणे इमामवाडा येथे मपोउपनि. नेहा कोंडेकर ९६६५१५६७७३ यांनी आरोपींविरूध्द कलम ४२०,३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**